ISSN 2231-1629
Knowledge Resonance
● Vol-9 No. 2 ● July-December 2020

# पंतप्रधान उज्ज्वला योजनेचे ग्रामीण भागातील महिलांच्या विकासात योगदान विशेष संदर्भ : पंढरपूर तालुका

**प्रा. डॉ. विलास किसन मगर**
समाजशास्त्र विभागप्रमुख, के. एम. सी. कॉलेज,
खोपोली ता. खालापुर जि. रायगड

**गोषवारा**

भारताची ओळख आजही कृशीप्रधान देश म्हणूनच होते. त्याला कारणही तसेच आहे की आज मितीस ही जवळपास 65% पेक्षा जास्त लोकसंख्या ग्रामीण भागात राहत आहे. या ग्रामीण भागाच्या सर्वांगीण विकासासाठी प्रत्येक सरकार प्रयत्नशील असते. वेगवेगळया योजनाच्या माध्यमातून ही विकासाची गंगा वाहत असते. या योजनेपैकी "पंतप्रधान उज्ज्वला योजना" ही आज सदयस्थितीला ग्रामीण भागातील महिलांच्या विकासात महत्वाची भूमिका बजावत आहे.

**प्रस्तावना :–**

महात्मा गांधीजींनी 'खेडयाकडे परत चला' हा मंत्र दिला हे आपणास सर्वांना ठावूक आहे. त्याचे प्रमुख कारण म्हणजे खरा भारत हा खेडयांमध्ये वसलेला आहे. जोपर्यंत खेडी स्वयंपूर्ण होवून विकसित होणार नाहीत तोपर्यंत खरा विकास हा होणारच नाही. ही खरी प्रमुख बाब यामागे आहे. आपण विज्ञान युगाच्या कितीही गप्पा मारल्या तरी खेडयांच्या विकासाशिवाय ग्रामीण भागातील महिलांचा सर्वांगिण विकास शक्य होणार नाही. म्हणूनच प्रत्येक देशातील सरकार या बाबींचा गांभीर्याने विचार करून त्यादृश्टीने विकासाच्या विविध योजना आखून सर्वांना प्रवाहात सामिल कसे करता येईल याच दृष्टीने नियोजन करीत असते.

विकासाच्या प्रमुख योजना म्हणजेच, अटल पेंशन योजना, बेटी बचाओ, बेटी पढाओ, राष्ट्रीय योजना, .शी विकास योजना, अंत्योदय योजना, मृदा आरोग्य कार्ड, स्वर्णजयंती, ग्राम स्वयंरोजगार योजना इ. योजनांच्या माध्यमातून सर्वांगिण विकासासाठी सरकार प्रयत्नशील असते. या योजनांनपैकी सदयस्थितीत ग्रामीण भागातील महिलांच्या जीवनात महत्त्वाची भूमिका बजावत असलेली एक प्रमुख योजना म्हणजेच "पंतप्रधान उज्ज्वला योजना" होय.

**पंतप्रधान उज्ज्वला योजना :–** ग्रामीण भागातील महिलांना दोन्ही वेळेस स्वयंपाक करताना ज्या त्रासदायक वेदनांना सामोरे जावे लागते त्यातून त्यांची मुक्तता करण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदींनी 1 मे 2016 रोजी 'स्वच्छ इंधन – बेहतर जीवन' असा नारा देत ही योजना संपूर्ण देशात सुरू केली. या योजनेअंतर्गत देशातील सर्व दारिद्रय रेषेखालील 5 कोटी महिलांना मोफत घरगुती स्वस्त गॅस उपलब्ध करून देण्याचे केंद्रशासनाच्या पेट्रोलियम व नैसर्गिक वायू मंत्रालयातर्फे नियोजन करण्यात आले आहे.

निम्न ग्रामीण व ग्रामीण भागात आजही पारंपारिक पद्धतीने चुलीवरच स्वयंपाक केला जातो. किंबहुना मोठया प्रमाणावर चुलीचाच वापर होतो. परिणामी चुलीच्या वापरामुळे खुप वेगवेगळया समस्यांना सामोरे जावे लागत असल्याचे दिसून आल्याने ही योजना राबविण्याचा निर्णय घेण्यात आला. यात ग्रामीण भागीतल महिलांच्या आरोग्याचा प्रमुख प्रश्न, केरोसिन मोठया प्रमाणावर वृक्षतोड इ. समस्या असल्याने यावर ही योजना अतिशय प्रभावीपणे काम करित असल्याचे दिसून येत आहे.

**उद्देश :–**

1) ग्रामीण भागात चुलीच्या वापरामुळे होणाऱ्या धुरामुळे लहान बालकांवर होणारा दुष्परिणाम टाळणे.
2) निम्न शहरी व ग्रामीण भागातील महिलांच्या आरोग्याची काळजी घेवून त्याचे सक्षमीकरण करणे.
3) ग्रामीण भागातील महिलांच्या डोळयावर व शरीरावर धुरामुळे होणारे दुष्परिणाम कमी करणे.
4) जंगलातील झाडाची वृक्षतोड थांबविणे.

**गृहितकः–**
पंतप्रधान उज्ज्वला योजनेची पंढरपुर तालुक्यातील दारिद्रय रेषेखालील महिलांच्या विकासात महत्वाची भूमिका आहे.

**संशोधन पद्धती**

**अभ्यास क्षेत्राची निवड :–** प्रस्तुत योजनेच्या अभ्यासासाठी संशोधकाने संशोधन विषयाचे अभ्यास क्षेत्र हे पंढरपूर तालुका निवडलेला असून या तालुक्यातील एकूण 100 लाभार्थ्यांची

निवड ही सहेतुक नमुना निवड पद्धतीचा वापर करून केलेली आहे.

**उत्तरदात्यांची निवड** :– प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने सोलापूर जिल्हयातील एकूण 1 लाख 60 हजार 741 लाभार्थ्यांपैकी पंढरपुर तालुक्यातील 100 लाभार्थ्यांची निवड ही सहेतुक नमुना निवड पद्धतीचा अवलंब करून केलेला आहे. यामध्ये संशोधकाने मुलाखत तंत्राचा वापर करून मुलाखत अनुसुचीद्वारे तथ्यांचे विवेचन कलेले आहे.

पंढरपूर तालुक्याची एकूण लोकसंख्या 4 लाख 42 हजार 368 एवढी असून यापैकी दारिद्रयरेषेखालील लोकसंख्या सुमारे 1 लाख 60 हजार पेक्षा जास्त असून पंढरपूर तालुक्यांतील एकूण 14 हजार लाभार्थ्यांपैकी सहेतुक नमुना निवड तंत्राचा वापर करून 100 लाभार्थ्यांची संशोधन विषयाच्या अभ्यासासाठी नमुना निवड म्हणून निवड करण्यात आलेली आहे.

**संशोधन विषयाचे महत्त्व** :–

1) पंतप्रधान उज्ज्वला योजनेचे खऱ्या अर्थाने ग्रामीण भागातील महिलांच्या विकासात मोठे योगदान असल्याचे दिसून येते.
2) सदरील योजनेमुळे पारंपारिक पद्धतीने स्वयंपाक करताना धुराचा महिलांना होणारा त्रास कमी झाला.
3) चुलीतील निघणाऱ्या हानिकारक धुरामुळे महिलांना वेगवेगळया आरोग्याच्या समस्यांना सोमोरे जावे लागत होते ते रोखण्यास या योजनेचे मोठे योगदान आहे.
4) चुलीवर स्वयंपाक करण्यासाठी मोठया प्रमाणात वृक्षतोड केली जायची त्यास आळा बसला आहे.
5) ग्रामीण भागातील दारिद्रय रेशेखालील महिलांचा एकूणच सामाजिक व आर्थिक विकास होण्यास या योजनेचा फार मोठा वाटा आहे.

**संशोधनाचे निष्कर्ष** :–

1) पंढरपूर तालुक्यातील दारिद्रय रेशेखाली असणाऱ्या महिलांना या योजनेचा लाभ मिळाल्याने त्यांचे सक्षमीकरण झालेले दिसून येत आहे.
2) गॅस चा वापर मोठया प्रमाणावर होत असल्याने पंढरपूर तालुका सध्या केरोसिन मुक्त तालुका होण्याकडे वाटचाल सुरू आहे.
3) या सदरील योजनेमुळे ग्रामीण भागातील महिलांची धुरापासून सुटका झाली.
4) धुरामुळे होणाऱ्या विविध आजारांपासून मुक्तता मिळाली आहे.
5) लहान मुलांच्या आरोग्यावर होणारे दुष्परिणाम कमी झाले आहेत.
6) या योजनेच्या वापरामुळे वृक्ष तोडीचे प्रमाण कमी झाल्याचे दिसून येत आहे.
7) गॅसच्या वापरामुळे पर्यावरणाचे संरक्षण होत आहे.
8) चुलीला लागणारा लाकुडफाटा आणण्यासाठी फार मोठा वेळ ग्रामीण भागातील महिलांचा जात असे. तो वेळ वाचल्याने त्यांचा वापर विविध कामासाठी होत असल्याने आर्थिक सक्षमीकरण होण्यास सुद्धा मदत झाली.
9) चुलीच्या धुरापासून होणारे विविध आजार कमी झाल्याचे दिसून येत आहे.
10) सदरील योजनेमुळे एकूण दारिद्रयरेशेखाली महिलांच्या गटात समाधानाचे वातावरण आहे.

**उपाय योजना** :– पंतप्रधान उज्ज्वला योजनेचे पंढरपूर तालुक्यातील ग्रामीण महिलांच्या विकासात असणारे योगदान या संशोधन विषयाच्या अभ्यासाअंती वरील संशोधनानुसार संशोधक काही उपाययोजना सुचवू इच्छितो.

1) सदरील योजनेची व्याप्ती ही फक्त दारिद्रय रेषेखालील महिलांसाठीच न ठेवता सर्वच स्तरातील महिलांसाठी असावी.
2) सदरील योजनेची ग्रामीण भागत अजून पुरेशी जन जागृती नाही. ही जनजागृती मोठया प्रमाणात व्हावी जेणे करून या योजनेचा सर्वच महिला लाभ घेतील.
3) सदरील योजनेसाठी आधार कार्ड सक्तीचे केलेले आहे परंतु कित्येक महिला आधारकार्ड विना आहेत. त्यामुळे या योजनेचा लाभ घेवू शकत नाही यावर काहीतरी पर्यायी तोडगा काढावा.
4) सदरील योजनेत गॅस जोडणी पासून ते गॅसचा वापर करण्यापर्यंत करणारी प्रक्रिया आजही ग्रामीण भागातील महिलांना या विषयी जागृतीचा अभाव आहे.
5) गॅस जोडणी काढताना बँकेचे पुस्तक व खाते क्रमांक आवश्यक आहे. खूप महिलांचे कागदपत्रा अभावी बँकेमध्ये खाते नाही यावर ही उपाय सुचवाविले पाहिजेत.

6) ग्रामीण भागत जरी ही योजना प्रभावी ठरत असली तर ही वितरण व्यवस्था म्हणावी तेवढी सक्षम नाही यावर उपाय करावेत.

7) गॅसची जोडणी झाल्यानंतर काही कालावधीनंतर रेग्युलेटर व पाईपची तपासणी नियमित होत नसल्याचे आढळून आले. परिणामी त्यावर विचार विनिमय होणे महत्त्वाचे आहे.

एकूणच संशोधकाला संशोधनाअंती पंढरपूर तालुक्यातील दारिद्रय रेशेखालील महिलांचे पंतप्रधान उज्ज्वला योजनेमुळे महिलांचे सक्षमीकरण झालेले दिसून येते. शिवाय चुलीतील धुरापासून सुटका होवून त्यापासूनचे होणारे विविध आजार पासून मुक्तता मिळाल्याची दिसून येते. तसेच धुरामुळे श्वासोच्छावासाचे होणारे विविध गंभीर आजार सुद्धा कमी झाल्याचे दिसून येत आहेत. एकूणच पर्यायाने पर्यावरणाचे सुद्धा मोठया प्रमाणावर होणाऱ्या दुष्परिणामाला आळा बसला आहे. 'पंतप्रधान उज्ज्वला योजना' ही ग्रामीण भागातील महिलांच्या विकासात महत्वाचे योगदान देत असल्याने ही योजना अधिक प्रभावी ठरत असल्याचे दिसून येते.

## *संदर्भ सूची*

*1) सोलापूर जिल्हा आर्थिक समालोचन 2015*
*2) महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक 201907241358012706*
*3) योजना मासिक*
*4) लोकराज्य*
*5) www.puy.com*
*6) www.zpsolapur.com*
*7) जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन 2018*
*8) www.ma harashtra.go .in*
*9) महाराष्ट्रातील शासकीय योजना*
*10.) प्रा.जे.के.जाधव, A toZ शासकीय योजना, साकेत प्रकाशन, 2018.*